# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## ई–निविदा

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना वितरण करावयाच्या महाप्रसादाचे नारळवडी बनविण्याच्या कामाचे कंत्राट देण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत. ई–निविदेबाबतची सविस्तर माहिती, अटी / शर्ती तसेच निविदा अर्ज डाउनलोड करण्याकरीता न्यासाची अधिकृत वेबसाईट www.siddhivinayak.org आणि शासन ई–निविदा संकेतस्थळ www.mahatenders.gov.in वर उपलब्ध आहे.

| निविदा संदर्भ क्र. | निविदा तपशील | निविदेची किंमत/शुल्क | बयाना रक्कम |
|---|---|---|---|
| ला.वि./प्र.क्र. ६९२/का.६ | १. महाप्रसादाची नारळवडी | रु. ३०००/– | रु. ५००००/– |

- ई–निविदा प्रसिध्दीचा दिनांक – दि. १३ एप्रिल २०१७.
- ई–निविदापूर्व बैठक दिनांक, वेळ व स्थळ – दि. २० एप्रिल २०१७, दुपारी ३.०० वा. ४ था मजला, न्यास कार्यालय.
- ई–निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ – दि. २८ एप्रिल २०१७, दुपारी २.०० वा. पर्यंत.
- तांत्रिक ई–निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व स्थळ – दि. २९ एप्रिल २०१७, दुपारी २.०० वा., ३ रा मजला, न्यास समिती कक्ष.
- मूल्य ई–निविदा उघडण्याचा दिनांक, वेळ व स्थळ – दि. २९ एप्रिल २०१७, दुपारी ४.०० वा., ३ रा मजला, न्यास समिती कक्ष.
- दि. १३ एप्रिल २०१७ पासून शासनाच्या संकेतस्थळावर ई–निविदा प्रपत्रे डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध आहेत.
- ई–निविदा प्रपत्राचे मूल्य ना परतावा स्वरुपाचे असेल.
- ई–निविदेसाठी डिजीटल सिग्नेचर प्राप्त करणे आवश्यक असेल.

(संजीव पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

# E-TENDER NOTICE

E-Tenders are invited for the preparation of Mahaprasad Coconut Burfi (Naralwadi), to be distributed among the devotees of Shree Siddhivinayak in the temple. The details of E-Tender and its terms and conditions can be obtained from the authorized website of the Temple trust www.siddhivinayak.org & Govt. E-Tender website at www.mahatenders.gov.in. The E-Tender Forms available on both the website.

| TENDER REF. NO. | TENDER PARTICULARS | COST OF TENDER FORM | EARNEST MONEY DEPOSIT |
|---|---|---|---|
| M.D./No. 692<br>Desk - 6 | 1 . Mahaprasad Coconut Burfi (Naralwadi) | Rs. 3000/- | Rs. 50000/- |

- E-Tender Publicity Date – 13th April, 2017.
- E-Tender Pre-bid Meeting – 20th April, 2017, 15.00 hours in 4th floor, Trust Office.
- Last date of submission of E-Tender Forms – 28th April, 2017, 14.00 hours.
- Date of opening of Technical E-Tender – 29th April, 2017, 14.00 hours at 3rd floor of Trust committee hall.
- Date of opening of Value E-Tender – 29th April, 2017, 16.00 hours at 3rd floor of Trust committee hall.
- E-Tender Forms are available to download from 13th April, 2017 on govt. website.
- Cost of E-Tender forms are non refundable.
- Digital signature is compulsory for E-Tender.

Sd/-
(Sanjeev Patil)
Executive Officer

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## महाप्रसादाची नारळवडी बनविण्याच्या कंत्राटाकरीता अटी व शर्ती

१. ई–निविदेसोबत अपलोड करावयाची कागदपत्रे, आर्थिक उलाढालीबाबतचे निकष, अटी/शर्ती, महाप्रसादाची नारळवडी बनविण्यासंबंधीची माहिती सोबत दिलेली आहे.

२. ई–निविदेची किंमत/शुल्क रु. ३०००/– व बयाना रक्कम रु. ५००००/– इतकी आहे.

३. ई–निविदा अपलोड करतेवेळी निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कम ऑनलाईन इंटरनेट बॅकींगमार्फतच जमा करावी लागेल. बयाना रक्कम कंत्राट करार संपल्यावर ९० दिवसानंतर परत केली जाईल. ई–निविदेची किंमत/शुल्क ना परतावा स्वरुपाचे असेल तसेच बयाना रक्कमेवर कोणत्याही प्रकारचे व्याज अनुज्ञेय होणार नाही / मिळणार नाही.

४. ऑनलाईन इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. बॅक किंवा इतर इंटरनेट बॅकींगकरीता एस. बी. आय. MOPS (Multiple Option Payment System) चा वापर करावा

५. ई–निविदा अपलोड करतेवेळी ऑनलाईन बॅकींगमार्फत न्यासास जमा केलेल्या निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कमेबाबतची पावती प्रत अपलोड करावी.

६. पूर्ण माहिती भरलेली ई–निविदा मुदतीत अपलोड करावयाची जबाबदारी निविदाधारकांवर आहे. मुदतीत न आलेल्या तसेच अपूर्ण ई–निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. ई–निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे त्याबद्दलची कारणे देणे न्यास व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

७. ई–निविदेसोबत निविदेची किंमत/शुल्क जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावती, बयाना रक्कम जमा केल्याबाबतची इंटरनेट बॅकेकडील पावती, शासन मान्य नोंदणी दाखला, सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र, आयकर नोंदणी पॅन कार्ड, व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र व व्हॅट भरल्याचे विवरणपत्र (आवश्यकतेनुसार), भागीदार कागदपत्रांची साक्षांकित झेरॉक्स प्रत (आवश्यकतेनुसार), सन २०१५–१६ चा वार्षिक उलाढालीबाबत लेखा परिक्षण अहवाल, मागील तीन वर्षातील उलाढालीची माहिती, काम करण्याची तयारी असल्याबाबतचे प्रमाणपत्र, अनुभवाच्या तपशीलाची छायाप्रत, प्रतिनिधी संदर्भात त्याचे नांवाचे प्राधिकार पत्राची प्रत इ. कागदपत्रे अपलोड करावीत. त्यानंतर आर्थिक ई–निविदा उघडण्यात येईल.

८. ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड कलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

९. महाप्रसादाची नारळवडी बनविण्याचे कंत्राटाचा कालावधी एक वर्षाचा असेल. कंत्राटाचा कालावधी कामाचे आदेश दिलेपासून ते ३१.०३.२०१८ अखेरपर्यंत वैध असेल. कंत्राट कालावधीमध्ये कंत्राटदाराचे काम समाधानकारक नसल्यास तसेच निकृष्ट दर्जाचे काम अथवा कामामध्ये कोणत्याही प्रकारचे गैरवर्तन आढळल्यास तात्काळ कंत्राट रद्द करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे.

१०. ई–निविदा मंजूर झाल्यानंतर ८ दिवसाच्या आत निविदाधारकाने कंत्राट कालावधीमध्ये करावयाच्या कामाच्या मजुरी रक्कमेच्या ३ टक्के रक्कमेची बॅक गॅरेंटी न्यासास सादर करावी. बॅक गॅरेंटी राष्ट्रीयकृत वा अनुसूचित बॅकेची द्यावी लागेल.

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

११. कंत्राट कालावधीमध्ये करावयाच्या कामाचा तपशील खालीलप्रमाणे.

नारळवडी महाप्रसाद

अ) नारळवडी बनविण्याकरीता नारळाचा कीस व साखर वापरण्यात येते.

ब) महाप्रसादाची नारळवडी बनविण्याकरीता वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालाचा वजनानुसार तपशील खालीलप्रमाणे –

| महाप्रसाद नारळवडी | |
|---|---|
| कच्चा माल | वजन |
| नारळाचा कीस | ७५ किलो |
| साखर | ५० किलो |
| **एकूण वजन** | **१२५.०० किलो** |

क) १०० किलो नारळवडी बनविण्याकरीता वापरण्यात येणारा नारळाचा कीस व त्याच्या वजनाच्या २/३ (दोन तृतिआंश) इतकी साखर वापरण्यात येते. (उदा. ७५ किलो नारळाचा कीस यानुसार ५० किलो साखर)

ड) नारळवडीचा आकार – लांबी ३.५ से.मी., रूंदी ३.५ से.मी., उंची (जाडी) १.५ से.मी. इतकी असेल.

इ) नारळवडीचे वजन – प्रति नग अंदाजे २०.८३ ग्रॅम इतके असेल.

ई) नारळवडी – प्रति किलोत अंदाजे ४८ नग इतके बनविण्यात येतात.

उ) **खालीलप्रमाणे नारळवडी महाप्रसाद बनविण्यात येईल.**

| अ.क्र. | कामाचा तपशील | वजन कि.ग्रॅ.(प्रति नग) | प्रमाण (प्रतिदिन अंदाजे नग) |
|---|---|---|---|
| १ | नारळवडी | २०.८३ ग्रॅम | २४,००० ते २८,८०० नग |

**टीप : वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकते नुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.**

१२. कंत्राट कालावधीमध्ये महाप्रसादाची नारळवडी तयार करताना आपल्या निष्काळजीपणामुळे कच्च्या मालाचे, तयार मालाचे किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान न्यासास पोहोचविल्यास नुकसान भरपाई करून घेण्यात येईल.

१३. नारळवडी महाप्रसाद बनविण्याकरीता लागणारे नारळ हे लहान, मोठे आकाराचे तसेच कमी जास्त प्रमाणात किशीचे असल्यामुळे नारळ फोडण्यासाठी अथवा नारळाची किशी सोलण्यासाठी वेगळी अदायगी दिली जाणार नाही.

१४. महाप्रसादाची नारळवडी बनविण्यासाठी गॅस शेगडी, गॅस, नारळ, नारळ किसण्याची मशीन व साखरेचा पाक मिक्स करण्याची मशीन न्यासातर्फे कंत्राटदारांस पुरविण्यात येतील.

१५. कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची संपूर्ण जबाबदारी कंत्राटदारावर राहील. नारळवडी बनविण्यासाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या प्रतिदिन ७ पेक्षा अधिक होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१६. कंत्राटदाराने नेमलेल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा दाखला (Health Card), कायम रहिवाशी दाखला व ओळखपत्र कंत्राटदाराने न्यासास देणे आवश्यक आहे.

१७. कंत्राटदाराकडून लावण्यात आलेल्या/नेमलेल्या कामगारांची/मजूरांची सुरक्षितता व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कामगार कायदा मजूरी अधिनियम आणि कामगार नुकसान भरपाई अधिनियमातील तरतूदीचे पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक असेल. यासंबंधाने न्यास कोणतीही जबाबदारी स्विकारणार नाही.

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई
S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558
(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

१८. कंत्राटदाराकडील सर्व कर्मचाऱ्यांना गणवेश (युनिफॉर्म), प्लॅस्टिक हॅडग्लोज, शॉवर कॅप, अॅपरॉन देणे बंधनकारक असेल. यासाठी होणारा खर्च कंत्राटदाराने करावयाचा आहे.

१९. सेवा कर, व्यवसाय कर, भ. नि. नि. योजना व अन्य कोणत्याही प्रकारच्या करासंदर्भातील जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

२०. कंत्राटदाराने दररोज स्वयंपाक गृहासह संपूर्ण मजल्याची साफसफाई करणे आवश्यक असेल.

२१. कंत्राट कालावधीत कंत्राटदाराने कच्च्या मालासह स्वयंपाक गृहातील वस्तू व मालमत्ता काळजीपुर्वक व जबाबदारीने वापरणे बंधनकारक असेल.

२२. कंत्राट कालावधीत नमुद केलेल्या महाप्रसाद बनविण्याच्या प्रमाणापेक्षा जास्त प्रमाणात महाप्रसाद बनविण्यात आल्यास सदर वाढीव काम मान्य दराने करणे आपणास बंधनकारक राहिल.

२३. गर्दीच्या दिवशी किंवा उत्सवामध्ये महाप्रसादाची प्रचंड मागणी असते. अशावेळी २ दिवस अगोदरपासून जादा प्रमाणात महाप्रसाद बनविण्याचे काम करणे तसेच त्याकरीता लागणाऱ्या जादा कामगारांची व्यवस्था करणे आपणांस बंधनकारक राहील.

२४. कामाचे कंत्राट अर्धवट सोडून गेल्यास न्यासास होणाऱ्या नुकसानाची भरपाई करुन देणे बंधनकारक असेल.

२५. मान्य दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ दिली जाणार नाही / मागता येणार नाही. आपण महाप्रसाद बनविण्याचे काम करावयाचे नाकारल्यास अथवा काम न केल्यास आपली पूर्णतः / अंशतः बयाना रक्कम न्यासात जमा करण्यात येईल. त्याबाबत न्यास व्यवस्थापनाचा निर्णय अंतिम राहील.

२६. मागील वर्षाची उलाढाल कमीत कमी रू. १० लक्ष असणे आवश्यक आहे.

२७. कंत्राट आदेश व मजूरी बिलाची रक्कम न्यास कार्यालयातून अदा होणार असल्यामुळे सदर व्यवहाराबाबत वाद झाल्यास तो मुंबई कोर्टाच्या न्याय कक्षेत राहील.

२८. न्यासाला कोणतीही कारणे न देता ई–निविदा / कंत्राट / काम स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार असेल.

२९. ई–निविदा मंजूर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांत समक्ष येवून स्टॅम्पपेपरवर करारनामा करून देणे बंधनकारक राहील. परंतू अशाप्रकारे करारनामा करून दिला नाही अथवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास निविदाधारकाने सादर केलेली निविदा न्यासाच्या अटी व शर्तीनुसार करारनामा म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. त्याबाबत कुठलीही तक्रार चालणार नाही. निविदेतील अटी व शर्ती कराराचा भाग असतील.

३०. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करण्याचा, शिथिल करण्याचा वा जादा अटी शर्ती विहीत करण्याचा अधिकार न्यास व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. कंत्राटदाराची कोणतीही अट/अटी न्यासावर बंधनकारक राहणार नाहीत.

३१. आर्थिक निविदा, निविदाधारकाबाबतची माहिती, ई–निविदेसोबत जोडावयाची कागदपत्रे, ई–निवेदेची किंमत/शुल्क मुळ भरणा पावती व बयाना रक्कमेची मुळ भरणा पावती तसेच इतर कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावी.

३२. ज्या दिवशी ई–निविदा उघडण्यात येणार आहेत त्या दिवशी ई–निविदेद्वारे अपलोड कलेल्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

३३. संकेतस्थळाच्या माहितीकरीता **टोल फ्री क्र. ०१२०–४२००४६२, ४००१००२ टोल फ्री मोबाईल क्र. ८८२६२४६५९३.**

(संजीव पाटील)
कार्यकारी अधिकारी

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## ई–निविदेची किंमत/शुल्क व बयाना रक्कम

| क्र. | कामाचा तपशील | वर्षभरात होणारे काम (अंदाजे) | चालू वर्षाच्या दराने मजुरी रक्कम रु. | निविदेची किंमत/शुल्क | बयाना रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २ | महाप्रसादाची नारळवडी | १,८२,५०० किलो | रु. १४,६०,०००/– | रु. ३,०००/– | रु. ५०,०००/– |

टिप : वर नमूद कामाचे प्रमाण हे अंदाजीत आहे. त्यामध्ये घट किंवा वाढ होऊ शकते.

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


## निविदाधारकाबाबतची माहिती

(१) संस्थेचे/फर्मचे नांव/व्यक्तीचे नांव :————————————————

अ. पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता :————————————————

————————————————

————————————————

ब. दूरध्वनी क्र. :————————————————

क. भ्रमणध्वनी (मोबाईल) :————————————————

ड. फॅक्स क्र. :————————————————

इ. ई—मेल :————————————————

(२) संर्पकासाठी व्यक्तीचे नांव (हुद्दयासह) :————————————————

अ. भ्रमणध्वनी (मोबाईल) :————————————————

(३) सद्या कार्य सुरू असलेल्या संस्थेचे नांव :————————————————

व पत्ता ————————————————

————————————————

(४) सेवा कर नोंदणी क्र. :————————————————

(४) व्हॅट नोंदणी क्र. :————————————————

(५) आयकर नोंदणी पॅन क्र. :————————————————

निविदाधारकाची सही व शिक्का

श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com

## ई–निविदेसोबत जोडावयाची कागदपत्रे

१. शासन मान्यता असलेले नोंदणी प्रमाणपत्र : ☐

२. आयकर नोंदणी पॅन कार्ड छायाप्रत : ☐

३. व्हॅट नोंदणी प्रमाणपत्र छायाप्रत : ☐

४. सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र छायाप्रत : ☐

५. ई–निविदेकरीता बयाणा रक्कम जमा केलेल्या पावतीची छायाप्रत : ☐

६. ई–निविदेची किंमत/शुल्क जमा केलेल्या पावतीची छायाप्रत : ☐

७. भागीदार कागदपत्रांची साक्षांकित छायाप्रत : ☐

८. काम करण्याची तयारी असल्याबाबतचे प्रमाणपत्र : ☐

९. अनुभवाच्या तपशीलाची छायाप्रत : ☐

१०. मागील ३ वर्षाच्या जमाखर्चाचा/उलाढालीचा तपशील : ☐

| अ.क्र. | वर्ष | उत्पन्न / उलाढाल |
|---|---|---|
| १ | २०१३ – २०१४ | |
| २ | २०१४ – २०१५ | |
| ३ | २०१५ – २०१६ | |

११. निविदाकार/संस्था/संघटनेच्या कामाचे क्षेत्र, कार्यरत कुशल मजूर/कर्मचारी यांची संख्या व माहिती याबाबतचा थोडक्यात सारांश : ☐

**टिप** :– ई–निविदेद्वारे अपलोड कलेल्या वरील सर्व कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रतींचा एक संच तपासणीसाठी न्यासास सादर करणे बंधनकारक असेल.

निविदाधारकाची सही व शिक्का

# श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास (प्रभादेवी) मुंबई

S.K. Bole Marg, Prabhadevi, Mumbai-28
: 2422 4438, 2422 2072 Fax : 2422 1558

(Controlled by Govt. Of Maharashtra)
www.siddhivinayak.org
e-mail : svt@vsnl.com


**महाप्रसादाचे नारळवडी बनविण्याच्या कंत्राटाकरीता**

दिनांक — / / २०१७

## आर्थिक निविदा (Commercial Bid)

निविदा मध्ये खालील बाबी अंतर्भुत करण्यात याव्यात.

१) निविदाधारकाचे नाव :————————————

२) निविदाधारकाचा कायम पत्ता :————————————

————————————

३) निविदाधारकाचा सेवा कर नोंदणी क्रमांक :————————————

४) व्हॅट नोंदणी क्रमांक :————————————

| अ. क्र. | तपशील | वजन (प्रति नग) | प्रमाण (प्रतिदिन अंदाजे नग) | न्यासास अपेक्षित कमाल दर अथवा त्यापेक्षा कमी दर | कंत्राटदाराचे दर (कर वगळून) |
|---|---|---|---|---|---|
| १. | नारळवडी महाप्रसाद | २०.८३ ग्रॅम | २४००० ते २८८०० नग | रु. ९ /— (एक किलो तयार नारळवडीकरीता) | रु. ........ पै. ........ (एक किलो तयार नारळवडीकरीता) |

टीप : १. वर नमुद कामाचा तपशील हा ढोबळ आहे. त्यामध्ये कमी जास्त बदल होऊ शकतो. न्यासाच्या आवश्यकते नुसार कंत्राटदारास कामाची पुर्तता करावी लागेल.

२. वर नमुद मजूरी दरामध्ये न्यासाने विहीत केलेल्या अटी व शर्तीनुसार स्वयंपाक गृहासह संपूर्ण मजल्याच्या साफ सफाईचा खर्च समाविष्ट करून दर नमुद करण्यात आलेले आहेत.

३. महाप्रसादाचे प्रति किलो तयार नारळवडीकरीता कंत्राटदाराचे दर आधारीत असतील.

निविदाधारकाची सही व शिक्का